# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/10/2023 (बुधवार) दुपार

---

## अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. खापा :– दिनांक ०३/१०/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १० वर्ष हा गुमगाव माईन येथे फुटबॉल खेळण्याकरीता गेला असता यातील **आरोपी नामे– विशाल प्रभु जनबंधु वय २४ वर्ष, रा. गुमगाव माईन खापा** याने फिर्यादीच्या मुलाला आपल्या स्कुटीवर बसवुन चॉकलेट घेवुन देतो असे म्हणुन गुमगाव माईन च्या ग्राउंड च्या बाजुला असलेल्या जंगलात घेवुन गेला. फिर्यादीच्या मुलाशी अनैसर्गिक कृत्य केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३७७ भांदवि. सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम, मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत १४ किमी अंतरावर मौजा मानेगावटेक शिवार येथे दिनांक ०२/१०/२०२३ चे २०.३० वा. ते २१.४० वा. दरम्यान देवलापार पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा मानेगावटेक शिवार येथे एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम. एच.– १४/सि पी.– ८३४९ हे संशयीत वाहन मिळुन आल्याने त्या वाहना जवळ जावुन त्याची पाहणी केली असता सदर वाहनात गौवंश जनावरांना अत्यंत क्रुर व निर्यदयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीत अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैध्यरित्या घेवुन मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातुन २४ नग पांढऱ्या रंगाचे बैल गौवंश प्रत्येकी किंमती १०,०००/– रू प्रमाणे किंमती २,४०,०००/– रू. जनावरे व २ गौवंश बैल मृत किंमती ००/ रू. असा एकुण २४००००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून अशा एकुण २६ बैल गौवंश यांना गौशाळा येथे दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोशि सचिन येळकर ब. नं. २३३९ पोस्टे देवलापार यांचे रीपोर्टवरून पोस्टे देवलापार येथे फरार आरोपीविरुध्द कलम २७९, ४२९ भादंवी सहकलम प्र,छळ प्रति,१९६० कलम ११(१) (जी), ११(१) (डी), ११(१) (सी), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिकारी १९९५ कलम ५ अ, ९, म पो अधिनियम १९५१ कलम ११९ कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड पोस्टे देवलापार मो. क्र. ९९२३९८८२९२ हे करीत आहेत.

## पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीमधील मौजा सोनेगाव शेत शिवारातील जुगार अड्डयावर धाड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ०३/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन बुट्टीबोरी परीसरातील मौजा सोनेगाव शेत शिवारातील उमेश भोले यांचे शेता मधील खुल्या शेड मध्ये काही इसम हे तासपत्यांवर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहिती पथकास प्राप्त झाले वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मौजा शेत शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) धिरज विनोद थुल, वय ३५ वर्ष, रा. दादरा पुल टिमकी नागपूर २) विजय शामराव गावंडे, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, जुनी वस्ती बुट्टीबोरी त. जि. नागपूर ३) कमलेश खुशाल साठवणे, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, बोरखेडी रेल्वे त. जि. नागपूर ४) सुरेश मनोहर ढोमणे, वय ५५ वर्ष, रा. सोनगाव बोरी जि. नागपूर ५) उमाकांत संपतराव खापने, वय ३४ वर्ष, रा. सोनेगाव (महार) जि. नागपूर ६) भरत मोहन वाडीभस्मे, वय ३० वर्ष, रा. रूईखैरी जि. नागपूर ७) ज्ञानेश्वर मारोती रंभाड, वय ४४ वर्ष, रा. सोनगाव बोरी जि. नागपूर ८) श्रावण भाऊराव वाघमारे, वय ४२ वर्ष, रा. सोनेगाव बोरी जि. नागपूर ९) दिनेश सुभाष रेखवार, वय ४८ वर्ष, रा. मोहम्मद अली चौक भालदारपुरा नागपूर शहर १०) जगदीश कोठीराम खापने, वय ३४ वर्ष, रा. सोनेगाव बोरी जि. नागपूर ११) विकास अभिमन गोटे, वय ५३ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ बोरखेडी रेल्वे, जि. नागपूर १२) अजय धनराज कैकाडे, वय ३६ वर्ष, रा. साईताज नगर बुट्टीबोरी, जि. नागपूर १३) नितीन मंगल माडेकर, वय ३४ वर्ष, रा. सोनेगाव बोरी जि. नागपूर १४) श्रीकांत माणिकराव ढोके, वय ४२ वर्ष, रा. सोनेंगाव बोरी जि. नागपूर १५) उमेश शंकरराव भोले, वय ३३ वर्ष, रा. सोनेगाव बोरी जि. नागपूर १६) सागर पंजाबराव धांडे, वय ४७ वर्ष, रा. कन्हाळगाव जि. नागपूर १७) मनोज अशोक जुनघरे, वय ३० वर्ष, रा. सोनेगाव बोरी जि. नागपूर** असे एकुण १७ इसम हे तासपत्यांवर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. असे एकुण १७ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) नगदी ५२,७८०/— रू. २) एक चार चाकी वाहन किंमती ९,००,०००/— रु. ३) १३ मोटारसायकली किंमती ७,१०,०००/— रू. व इतर साहित्य असा एकुण १६,६२,८३०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपींतांविरूध्द पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पोलीस ठाणे बुट्टीबोरी करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, मयूर ढेकले, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे, पोलीस अंमलदार राकेश तालेवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर